# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## शैक्षणिक प्रवेश विभाग

### विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

### एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. स्कॉलरशीप व फ्रिशिप नवीन व नुतनीकरण असणाऱ्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे

मा. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या आदेशानुसार एस.सी/ विजाभज/इमाव/विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने सन २०१५–१६ स्कॉलरशीप व फ्रिशिप अर्ज भरावयाचे आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जाणार असल्याने समाजकल्याण विभागाने दिलेल्या मुदतीतच अर्ज भरण्यात यावे. सोबत समाजकल्याण विभागाने मान्य केलेल्या अभ्यासक्रमाची प्रवर्ग निहाय यादी तसेच अर्ज नुतनीकरण करणेबाबत सुचना व माहिती पुस्तिकेची प्रत जोडत आहे. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना खालील वेबसाईटवरून प्रथम User ID तयार करून Login करून अर्ज भरावेत.

http://mahaeschol.maharashtra.gov.in/Esholarshipstudent

जे अभ्यासक्रम शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी शासनाच्या वेबसाईट उपलब्ध आहे अशा विभागातील विद्यार्थ्यांनी त्वरीत Online अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

वेबसाईटवरील अर्ज पुर्ण भरून त्याची एक प्रिंट काढून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबंधित विभागात अर्ज जमा करावेत. विभागाने प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती/फ्रिशीप याप्रमाणे वेगवेगळी करून Excel Format मध्ये भरून सीडी व हार्ड कॉपीसह पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवावी. Online पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरताना खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

ऑनलाईन पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरतांना विद्यार्थ्यांसोबत खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. इयत्ता १० वी पासूनच्या सर्व गुणपत्रिका (पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी मधील परीक्षा क्रमांक व आसन क्रमांक टाकणे बंधनकारक आहे).
२. स्वत:चे वैयक्तिक राष्ट्रीयकृत बँकेतील विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक, बँकेचा एमआयसीआर आणि आयएफएससी कोड नंबर झेरॉक्स प्रत.

३. जातीचा दाखला.
४. शाळा सोडल्याचा दाखला.
५. तहसिलदाचा उत्पन्नाचा दाखला किंवा फॉर्म १६ ची झेरॉक्स प्रत
६. आधार कार्डची झेरॉक्स प्रत (बँकखाते क्रमांक आधार कार्डशी संलग्न करणे.).
७. विभागात प्रवेश घेतलेल्या प्रवेश पत्राची झेरॉक्स
८. २०१५–१६ या शैक्षणिक वर्षाच्या अगोदर पदव्युत्तर परिक्षा दिलेली असेल तर त्याबाबतच्या उल्लेख करावा व त्यासंबधी प्रमाणपत्र जोडावे.
९. एखादया विद्यार्थ्याने चुकीच्या माहीतीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंखन करून शिष्यवृत्ती मिळवली असेल त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल व फी वसूल केली जाईल.
१०. बँक खात्याबाबत काही चुकीची माहीती दिल्यास होणा–या आर्थिक नुकसानीस तो विद्यार्थी स्वत:च जबाबदार असेल यांची नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी वेळेत Online पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना स्कॉलरशीप व फ्रिशीप शासनाकडून मिळणार नाही. त्यामुळे होणा–या आर्थिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. तसेच ज्या विद्यार्थ्यांची फी शासनाकडून परतावा होणार नाही किंवा संबधीत अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती योजना लागु नसल्यास अशा प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्या अभ्यासक्रमासाठी लागु असलेले संपूर्ण शुल्क भरणे बंधनकारक आहे. याची नोंद घ्यावी.

सही. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/३३५४
दिनांक : ०६/०८/२०१५

प्रत :मा. विभागप्रमुख,
आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात तसेच अर्जाच्या प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विहित मुदतीत या विभागाकडे सादर करण्यात यावे. समाजकल्याण विभागाने दिलेल्या सूचनेनुसार शिष्यवृत्तीसंदर्भात कार्यवाही व्हावी.

## महाविद्यालय अभ्यासक्रम यादी

शोधा  कृपया मुख्य शब्द टाका

टिप: आपल्या महाविद्यालयाचे अभ्यासक्रम बघण्यासाठी महाविद्यालयाचा जिल्हा निवडा.

जिल्हा : Pune

**अभ्यासक्रम यादी पहा**

Show All entries    Search: 15454

| अभ्यासक्रमाचे नाव | अनुदानित | विनाअनुदानित | Eligible for SC | Eligible for OBC / SBC / VJNT |
|---|---|---|---|---|
| Savitribai Phule University of Pune (१५४५४) | | | | |
| Master of Library and Information Science | YES | Not defined | YES | YES |
| Advanced Certificate Course in Buddhist Studies in Pali | Not defined | YES | YES | NO |
| Advanced Diploam course in Buddhist Studies in Pali | Not defined | YES | YES | NO |
| Bachelor of Arts(Dance) | YES | YES | YES | YES |
| Bachelor of Arts(Drama) in Lalit Kala Kendra | Not defined | YES | YES | NO |
| Bachelor of Arts(Music) in Lalit Kala Kendra | Not defined | YES | YES | NO |
| Certificate Course in Manuscriptology | YES | Not defined | YES | NO |
| Diploma in Logic and Epistemology | YES | Not defined | YES | NO |
| Diploma in Sanskrit linguistic | YES | Not defined | YES | NO |
| Diploma in Journalism | Not defined | YES | YES | NO |
| Executive MBA | Not defined | YES | YES | NO |
| Higher Diploma Course in Buddhist Studies | Not defined | YES | YES | NO |
| Higher Diploma Course in Pali | Not defined | YES | YES | NO |
| Lower and Higher Diploma course in Sanskrit and Prakrit Languages | Not defined | YES | YES | NO |
| Lower Diploma in Course in Pali | Not defined | YES | YES | NO |
| M.SC./M.tech Integrated Biotechnology in IBB | Not defined | YES | YES | NO |
| M.tech.Ph.D(Integrated) in technology | Not defined | YES | YES | NO |
| Master fo Technology(School of Energy Studies) | YES | Not defined | YES | NO |
| Master in Commerce (E-Commerce) | Not defined | YES | YES | NO |
| Master in Education in Physical Education | Not defined | YES | YES | NO |
| Master of Arts ( Culture and Development Studies ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Arts ( Defence and Strategic Studies ) | YES | Not defined | YES | NO |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Master of Arts ( Pali ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Arts ( Prakrut ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Arts ( Prayojanmulak Hindi ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Arts ( Sahitya Hindi ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Arts B.Y.(Drama) in Lalit Kala Kendra | Not defined | YES | YES | NO |
| Master of Arts B.Y.(Music) in Lalit Kala Kendra | Not defined | YES | YES | NO |
| Master of Arts in Education | Not defined | YES | YES | YES |
| Master of Arts in Anthropology | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in Economics | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in English | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in Geography | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in History | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in Marathi | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in Philosophy | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in Politics | YES | YES | YES | YES |
| Master of Arts in Psychology | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts in Sociology | YES | YES | YES | YES |
| Master of Arts Pali Buddhist/Literature | YES | Not defined | YES | NO |
| Master of Arts(Dance) | YES | YES | YES | YES |
| Master of Arts(Drama) in Lalit Kala Kendra | Not defined | YES | YES | NO |
| Master of Arts(Music) in Lalit Kala Kendra | Not defined | YES | YES | NO |
| Master of Arts(Sanskrit) | YES | Not defined | YES | YES |
| Master of Arts(Statistics) | YES | YES | YES | NO |
| Master of Business Administration | YES | YES | YES | YES |
| Master of Commerce | YES | YES | YES | YES |
| Master Of Computer Application(M.C.A) | YES | YES | YES | YES |
| Master of Education | YES | YES | YES | YES |
| Master of Law(LL.M) | YES | Not defined | YES | YES |
| Master of Mass Communication & Journalism | YES | YES | YES | NO |
| Master of Science ( Health Sciences ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Science ( Communication Studies ) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Science ( Defence and Strategic Studies ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Science ( Instrumentation ) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Science (Computer Science) | YES | YES | YES | NO |
| Master of Science (Inorganic Chemistry) | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science (Physical Chemistry) | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Analytical Chemistry | Not defined | YES | YES | YES |
| Master of Science in Biochemistry | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Bioinformatics | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Biotechnology | YES | YES | YES | YES |
| Master of Science in Botany | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Environmental Science | YES | YES | YES | YES |
| Master of Science in Geoinformatics | Not defined | YES | YES | YES |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Master of Science in Mathematics | YES | YES | YES | YES |
| Master of Science in Microbiology | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Physics | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Statistics | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Zoology | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science in Electronic | YES | YES | YES | YES |
| Master of Science in Environment | YES | YES | YES | YES |
| Master of Science in Medicinal Chemistry | YES | YES | YES | NO |
| Master of Science in Organic Chemistry | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science(Anthropology) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Science(Geography) | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science(Geology) | YES | Not defined | YES | YES |
| Master of Science(Interdisciplinary School of Scientific Computing) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Science(Virology) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Technology ( Mathematics ) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Technology ( Atmospheric and Space Sciences ) | YES | Not defined | YES | NO |
| Master of Technology ( Modeling and Simulation ) | YES | YES | YES | NO |
| Master of Technology (Computer Science & Technology) | YES | YES | YES | NO |
| Master of Technology Biotechnology in IBB | Not defined | YES | YES | NO |
| Master of Technology( Chemical and Biotechnology) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Technology( civil and Environmental) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Technology( Computer and Information technology) | YES | YES | YES | NO |
| Master of Technology( Electronics and Electronics) | Not defined | YES | YES | NO |
| Master of Technology( Mechanical and Material) | Not defined | YES | YES | NO |
| Master Public health in Health Sciences | YES | YES | YES | NO |
| MBA (BT ) | Not defined | YES | YES | NO |
| MBA ++ | Not defined | YES | YES | NO |
| P.G.B.Sc(Applied) in Geography | Not defined | YES | YES | NO |
| Post Graduate Course in Applied Mahayana Buddhist Psychology and Etics | Not defined | YES | YES | NO |
| Post Graduate Diploam Course in Buddhist Studies in Pali | Not defined | YES | YES | NO |
| Post Graduate Diploma ( Electronics ) | Not defined | YES | YES | NO |
| Post Graduate Diploma course in Pali | Not defined | YES | YES | NO |
| Post Graduate Diploma Course in Socially Engaged Buddhism | Not defined | YES | YES | NO |
| Post Graduate Diploma in Higher Education | YES | YES | YES | NO |
| Special Diploma ( Foreign Language ) | YES | YES | YES | NO |

Showing १ to १०० of १०० entries (filtered from ५,२४५ total entries)

First Previous १ Next Last



हे समाज कल्याण विभागाचे अधिकृत संकेतस्थळ आहे, महाराष्ट्र सरकार

प्रतिलिपि अधिकार © २०१२ | हे संकेतस्थळ बघण्यासाठी सर्वोत्तम वियोजन १०२४x७६८ आहे.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परीक्षा फी चा लाभ मिळणेसाठी कागदपत्रे तयार ठेवणेबाबत आवाहन.

---

**विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. दहावी /बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व गुणपत्रिका /मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका.
२. जातीचा दाखला.
३. जाती प्रमाणपत्र पडताळणी दाखला .
४. आधारकार्ड क्रमांक.
५. ज्या राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडले आहे तो बँक खाते क्रमांक, बँकेचा IFS कोड, MICR कोड
६. बँक खाते क्रमांक आधारकार्डाशी संलग्न करणे.
७. सक्षम अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला.
८. पासपोर्ट आकाराचे फोटो.

- पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा केली जाते. यासाठी बँक खाते क्रमांक व आधार क्रमांक अत्यावश्यक आहे.
- पात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क त्यांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे त्या महाविद्यालयाच्या बँक खात्यावर परस्पर जमा केले जाते.
- अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षीच विद्यार्थ्यांना अर्ज करावा लागेल, त्यानंतर अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही.

तेव्हा विद्यार्थ्यांना व पालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वरील कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन ती तयार ठेवावीत, जेणेकरुन ऐनवेळी धावपळ होणार नाही.

सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर शिष्यवृत्तीची वेबसाईट सुरु केली जाईल, त्यासाठी वरील संकेतस्थळाशी संपर्कात रहावे.

**(रनजित सिंह देओल)** भा.प्र.से.
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.




# प्रवेशित (जुन्या) विद्यार्थ्यांचे अर्ज नुतनीकरण करण्यासाठी महाविद्यालयाकरिता माहिती पुस्तिका

## २०१५-२०१६

# माहिती पुस्तिका

**प्रस्तावना :**

सन 2010-11 या शैक्षणिक वर्षापासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी या योजना संगणकीकृत करण्यात आलेल्या असून विद्यार्थ्यांनी या योजनेचा फायदा घेण्यासाठी अर्ज

ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावयाचे आहेत. ऑफ लाईन पाठविलेले किंवा प्रत्यक्ष अर्ज स्वीकृत केले जाणार नाहीत, अशाही सूचना तेव्हा पासून निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

प्रत्येक वर्षी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https: //mahaeschol.maharashtra.gov.in या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरावा लागतो. पूर्वी हा अर्ज प्रत्येक वर्षी भरणे बंधनकारक होते.

**सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी ऑनलाईन अर्ज भरण्याची आता आवश्यकता नाही.**

विद्यार्थ्यांने अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेतानाच ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. त्यानंतर संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत त्याला प्रत्येक वर्षी ऑनलाईन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. उदा. 11 वी प्रवेश घेताना विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरेल, तो इ. 11 वी उत्तीर्ण झाल्यानंतर पुन्हा **इ. 12 वी साठी** अर्ज भरणार नाही. तथापी महाविद्यालयाने तो उत्तीर्ण झाल्याची व आपल्या महाविद्यालयात प्रवेशीत असल्याची खात्री करुन त्याच्या अर्जाचे नुतनीकरण करुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण या कार्यालयाकडे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करावयाचा आहे. **केवळ प्रथम वर्ष पदवीका, प्रथम वर्ष पदवी, प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी, प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवीका, प्रथम वर्ष पदवीका प्रमाणपत्र अभ्यासक्रम, इयत्ता 10 वी 12 वी नंतरचे पूर्णकालिका पदवीका अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षीच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत.** त्यानंतर त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत त्याचे नुतनीकरण संबंधित महाविद्यालय करणार असल्याने विद्यार्थ्यांना पुन्हा ऑनलाईन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

ज्या अभ्यासक्रमास डायरेक्ट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश दिला जातो अशा अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी दुसऱ्या वर्षात डायरेक्ट प्रवेश घेताना तो ऑनलाईन अर्ज भरुन घ्यावयाचा आहे. उदा. डिप्लोमा, सिव्हील इंजिनिअरिंग नंतर डायरेक्ट व्दितीय वर्ष बीई / बीटेक सिव्हील या डिग्री कोर्सला प्रवेश घेताना ऑनलाईन अर्ज करुन प्रवेश घ्यावा. तथापी तृतीय (टीई) आणि चतुर्थ (बीई) या वर्षी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरावयाची आवश्यकता नाही तथापी, महाविद्यालय नुतनीकरण करेल.

**नुतनीकरण प्रक्रिया** :-

महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचे व्दितीय वर्ष ते त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत (अभ्यासक्रमाचा कालावधी संपेपर्यंत) खालील बाबींची खात्री करुन शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी या अर्जाचे नुतनीकरण करावयाचे आहे.

1) संबंधित विद्यार्थी हा त्या कॉलेजमध्ये नुतनीकरण करावयाच्या वर्षामध्ये प्रवेशित असावा.
2) सदरील विद्यार्थी मागील वर्षी उत्तीर्ण झालेला असावा.
3) सदर विद्यार्थ्यांचे उत्पन्न हे शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फीसाठी अनुज्ञेय असलेल्या उत्पन्न मर्यादेत असावे.
4) सदर विद्यार्थ्याने Gap घेतला असेल किंवा तो अनुत्तीर्ण झालेला असेल इतर कारणामुळे अपात्र असेल अशा अपात्र विद्यार्थ्यांचे नुतनीकरण करण्यात येऊ नये. अन्यत: त्याच्या फीची / शिष्यवृत्तीची वसुली महाविद्यालयास देय होणाऱ्या शिक्षण फीच्या रक्कमेतून करण्यात येईल.


5) नुतनीकरण अर्जामधील विद्यार्थ्यांची सर्व माहिती अचूक व खात्री करुनच महाविद्यालयाने भरावी.

6) प्रचलित शासन **निर्णयातील तरतुदीनुसार** सदर विद्यार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी करुन नुतनीकरण करावे.

7) विद्यार्थ्यांचे नुतनीकरण करुन तो अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे महाविद्यालयाने ऑनलाईन फॉरवर्ड केल्यानंतर तो विद्यार्थी शिक्षण फी / शिष्यवृत्ती या योजनेस पात्र आहे असे समजण्यात येईल, विद्यार्थ्याची पात्रता, महाविद्यालयाची मान्यता व संलग्नता अभ्यासक्रमाची मान्यता आणि अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता या सर्व बाबीची खात्री व पडताळणी करण्याची जबाबदारी प्राचार्याची असेल.

## अ) प्राथमिक बाबी :-

I. https://mahaeschol.maharashtra.gov.in हे पोर्टल **open केल्यानंतर** तुम्हाला **Home page** दिसेल. Home page वरील login मध्ये गेल्यावर **User Name व password** हे दोन Box आहेत.





II. त्यामध्ये महाविद्यालयाचा user id आणि password भरावा.

III. त्यानंतर त्या खालील चित्रामध्ये दाखविलेले अक्षर टाईप करा.

IV. जर ही अक्षरे व्यवस्थित दिसत नसतील तर चित्रातील लाल बटनवर क्लिक करा.

V. त्यानंतर स्क्रिनवर पुन्हा दिसणारी अक्षरे पुन्हा Box मध्ये टाईप करा.

VI. त्यानंतर ''**प्रवेश करा**'' या बटन वर क्लिक करा.




ब) **password बदलणे**:-


I. जर आपणास password बदलावयाचा असल्यास जुन्या password समोरील Box मध्ये जुना password टाका.

II. त्यानंतर जो नवीन password द्यावयाचा आहे तो नव्या password Box मध्ये टाईप करा.

III. नवीन password पुन्हा एकदा दुसऱ्या password बॉक्समध्ये परत टाईप करुन निश्चित करावा.

IV. त्यानंतर चित्रात दाखविलेले अक्षर टाईप करा.

V. त्यानंतर जतन करा हे बटन क्लिक करा.





## क) योजना निवडणे :–

i. ज्या योजने मध्ये आपणास काम करावयाचे आहे ती योजना निवडण्यासाठी menu bar वरील ‘‘**योजना**’’ या बटन वर क्लिक करा.

ii. योजनेची नांवे असणारा menu open होईल

iii. ज्या योजनेमध्ये आपणास काम करावयाचे आहे त्या ‘‘**योजनेच्या नावावर क्लिक**’’ करा.




## ड) अर्ज नुतनीकरण:


I. यानंतर मेनू बार वरील अर्ज नुतनीकरण करण्याची विंडो ओपन होण्यासाठी मेनू बार वरील **''पडताळणी''**

या बटनवर क्लिक करा.

II. क्लिक केल्यानंतर आपणा समोर मेनू ओपन होईल.

III. या मेनू मधील **''अर्जाचे नुतनीकरण''** या मेनूवर क्लिक करा.

IV. क्लिक केल्यानंतर अर्ज नुतनीकरण ही विंडो ओपन होईल.





I. या विंडो मध्ये ज्या वर्षाचे अर्ज नुतनीकरण करावयाचे आहेत, त्या वर्षाचे पाठीमागचे वर्ष निवडावे. उदा. सन २०१५-२०१६ या वर्षाच्या विद्यार्थ्यांचे अर्ज नुतनीकरण करावयाचे असेल तर मागील वर्षाचे म्हणजे २०१४-२०१५ हे वर्ष उघडून त्या वर्षी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज आपणास उघडावे लागतील.

II. ज्या प्रवर्गाच्या अर्जावर आपणास नुतनीकरणाची कार्यवाही करावयाची आहे, तो प्रवर्ग निवडा.

III. त्यानंतर अनुदानित अभ्यासक्रमाचे विद्यार्थी निवडावयाचे असतील तर **''मान्य प्रकार''** या बॉक्स मधून **''अनुदानित''** पर्याय निवडा आणि ''विना अनुदानित'' अभ्यासक्रमाचे विद्यार्थी असतील तर **''विना अनुदानित''** पर्याय निवडा.

IV. त्यानंतर **''योजना''** या बॉक्स मध्ये कोणत्या योजनेच्या विद्यार्थ्यांचे नुतनीकरण करावयाचे आहे तो पर्याय म्हणजे ''भारत सरकार शिष्यवृत्ती,'' शिक्षण फी, परिक्षा फी, विद्या वेतन इत्यादी पैकी एक पर्याय निवडा.

V. त्यानंतर **''अभ्यासक्रमानुसार माहिती मिळवा''** या बटनवर क्लिक करा.




I. त्यानंतर आपल्या महाविद्यालयामध्ये जेवढे अभ्यासक्रम map झाले आहेत त्याची यादी

स्क्रिनवर दिसेल.उदा. अभ्यासक्रमाचे नांव, यामध्ये ११ वी आर्टस, ११ वी सायन्स, ११ वी कॉमर्स, १२ वी आर्टस १२ वी सायन्स, १२ वी कॉमर्स बीए प्रथम वर्ष, बीए व्दितीय वर्ष

इत्यादी ड्रॉपडाऊन केल्यानंतर माहिती दिसेल. त्यापुढे विद्यापीठाचे नांव, त्यापुढे अभ्यासक्रमाचे वर्ष याबाबी दिसतील.

## इ) अभ्यासक्रमाचे वर्ष

i. बीए 1 असेल तर पहिले वर्ष, बीए 2 असले तर दुसरे वर्ष बीए 3 असेल तर तिसरे वर्ष असे समजावे.

ii. त्यानंतर आपणास शिष्यवृत्ती अर्जावर नुतनीकरण करावयाचे असेल तर ``**शिष्यवृत्ती**'' या menu वरील नावाखाली शिष्यवृत्तीसाठी किती अर्ज भरले गेले आहेत याची संख्या दिसेल. त्या **आकडयावर** क्लिक करा.

iii. जर तुम्हास free sheep च्या अर्जावर प्रक्रिया करावयाची असेल तर free sheep लिहीलेल्या menu खालील **आकडयावर** क्लिक करा.

| अभ्यासक्रमाचे नाव | विद्यापीठाचे नाव | अभ्यासक्रम वर्ष | शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|
| ११th Arts | Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education | १ | १ |

Showing १ to १ of १ entries — First Previous १ Next Last

## फ) प्रत्यक्ष नुतनीकरणाची प्रक्रिया:-

I. आता आपणासमोर विद्यार्थी निहाय नुतनीकरण करण्यासाठी यादी window मध्ये दिसेल, त्या मध्ये विद्यार्थ्याचे नांव, आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक, अभ्यासक्रमाचे नांव, विद्यापीठाचे नांव, मान्यता प्रकार, मागील परिक्षेचा निकाल, मागील गुणांची टक्केवारी, विद्यार्थ्यांनी चालू वर्षी भरलेली शिक्षण फी, परक्षिा फी इतर फीची रक्कम नुतनीकरण करण्यासाठी त्या विद्यार्थ्यांनी चालू वर्षात ज्या ठिकाणी प्रवेश घेतला आहे ती तारीख, तो वसतिगृहात राहतो काय ? राहत असेल तर वसतिगृहामध्ये कधी प्रवेश घेतला या बाबी menu वर दिसतील व त्या खाली प्रत्येक विद्यार्थ्यासमोर ज्या Box मध्ये आपोआप माहिती (By defaults) दिसत नाही अशा box मध्ये महाविद्यालयाने माहिती भरावयाची आहे किंवा आवश्यक तेथे Dropdown menu व्दारे *selection* करावयाचे आहे. रिकाम्या जागी पूर्ण माहिती भरल्याशिवाय किंवा ड्रॉपडाऊन मेनूव्दारे select केल्याशिवाय software पुढे Run होणार नाही.

II. जेवढया विद्यार्थ्यांच्या नुतनीकरणाची माहिती आपणाकडे उपलब्ध आहे तेवढया विद्यार्थ्यांची details भरावीत. येथे विद्यार्थ्यांचे जनरल रजिस्टर मधील क्रमांक, मागील परिक्षेचा निकाल, यामध्ये तो पास आहे की नापास किंवा ATKT आहे, त्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या मार्काची टक्केवारी, याबाबी व अन्य बाबी सुध्दा टाईप / टंकलिखीत करुन भरावयाच्या आहेत.

III. ही माहिती भरण्यापूर्वी खालील बाबींची खात्री करणे संबंधीत लिपीकांना / प्राचार्यांना बंधनकारक आहे.

अ) मागील वर्षी विद्यार्थी प्रवेशीत होता का ?

ब) चालू वर्षी या विद्यार्थ्याने प्रवेश चालू ठेवला आहे काय ?

क) त्याचा आधार क्रमांक तपासणीसाठी आधारकार्डची प्रत पहावी.

ड) त्याचा बँक खाते क्रमांच्या नावाची **IFSC code, MICR code** याची खात्री करण्यासाठी त्याचे बँक पास बुक पहावे.

इ) मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमास त्याने प्रवेश घेतला आहे त्याच अभ्यासक्रमास चालू वर्षी सुध्दा तोच प्रवेशित आहे याची खात्री करावी.

फ) संबंधित विद्यार्थी मागील वर्षी त्याच विद्यापीठात होता का दुसऱ्या विद्यापीठातून मायग्रेट होऊन आला याची खात्री करावी.

ग) सदर विद्यार्थ्यांने विना अनुदानित कोर्सला प्रवेश घेतला आहे किंवा अभ्यासक्रम बदलला आहे का याची खात्री करावी.


ह) सदर विद्यार्थी पास, नापास किंवा ATKT आहे याची आणि त्याचे गुण व टक्केवारीची खात्री त्याच्या mark list वरुन करावी.

छ) Mark list मध्ये लिहीलेले गुण व गुणांची टक्केवारी नमूद करावी.

ज) विद्यार्थ्याने या वर्षी फी ची रक्कम भरली असेल तर भरलेल्या रक्कमेचा आकडा लिहावा.

नुतनीकरणाचे सर्व रकाने भरताना ही माहिती समोर ठेवून ती **अचूक भरण्याची जबाबदारी संबंधित लिपीक व प्राचार्य याची आहे.**

त्यानंतर ही सर्व माहिती भरल्यानंतर **''नुतनीकरण करा''** या बटनवर क्लिक करा.



कृपया अर्ज नूतनीकरण करण्यापूर्वी अभ्यासक्रम, विद्यापीठ वगैरे सर्व माहिती तपासून घ्यावी
कृपया विद्यार्थ्याचे महाविद्यालय बदललेले असल्यास नुतनीकरण करू नये

Show 10 entries Search:

| ☐ | विद्यार्थ्याचे नाव | आधार क्रमांक | बँक खाते क्रमांक | नोंदणी क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यापीठाचे नाव | मान्यता प्रकार | मागील परीक्षेचा निकाल | मागील परीक्षेची टक्केवारी | विद्यार्थ्याने भरलेली रक्कम | नुतनीकरण अभ्यासक्रम वर्षाची प्रवेश तारीख | वसतिगृहात राहता का | वसतिगृह प्रवेश तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ☑ | sumehjej nehwjsk maojr | | ५६७८८ | 1 | Bachel | Rashtr | विनाअनु | पास | 85.63 | 0 | 25/06/2015 dd/mm/yyyy | नाही | _/_/_ dd/mm/yyyy |

Showing 1 to 1 of 1 entries — First Previous 1 Next Last

नुतनीकरण करा

## ग) प्राचार्य यांनी करावयाची कार्यवाही : –

➢ **अर्जामधील विद्यार्थ्याचे नाव व अर्ज क्रमांकाच्या रंगावरून ते कोणत्या प्रकारचे आहेत हे खालील प्रमाणे कळेल.**

**नवीन अर्ज** ■

**नुतनीकरण झालेले अर्ज** ■

**ट्रान्सफर झालेले अर्ज** ■

I. लिपीकाने आपल्या id वरुन ''नुतनीकरण करा'' हे बटन क्लिक केल्यानंतर जेवढया विद्यार्थ्यांची माहिती भरलेली आहे तेवढया विद्यार्थ्याची माहिती प्राचार्य ID login ला दिसेल.

II. प्राचार्य login ला forward झाल्यानंतर प्राचार्यने उपरोक्त **क्र. अ ते फ** प्रमाणे कार्यवाही करावी.

III. प्राचार्य login मध्ये आल्या नंतर menu वरील **''पडताळणी''** या बटनवर क्लिक केल्यानंतर **''अर्ज मंजुरी बदल''** हा menu open होईल.

IV. **''अर्ज मंजुरी बटन''** या menu वर क्लिक केल्यानंतर अर्ज मंजुरी ही window open होईल.

V. त्यामध्ये ज्या शैक्षणिक वर्षाच्या अर्जाचे नुतनीकरण करावयाचे आहे, त्या वर्षाचे मागील वर्ष निवडावे.

VI. त्यानंतर प्राचार्यांना ज्या प्रवर्गाचे अर्ज मंजूर करावयाचे आहेत तो मागास प्रवर्ग निवडावा. उदा. अनु.जाती, विजाभज, इमाव, विमाप्र इत्यादी.

VII. त्यानंतर अनुदानित अभ्यासक्रम की विना अनुदानित अभ्यासक्रमाचे अर्ज मंजूर करावयाचे आहेत त्याप्रमाणे **''मान्यता प्रकार''** निवडावा.

VIII. **''ज्या तारखेपर्यंतचे अर्ज''** या Box मध्ये प्राचार्याने ठराविक तारीख टाकली तर त्या तारखेपर्यंत लिपीकानी Forward केलेले अर्ज दिसतील.

IX. आणि जर त्या Box मध्ये कोणतीही तारीख टाकली तर आजच्या तारखेपर्यंत मंजूर करुन DSW ला Forward न केलेले सर्व अर्ज दिसतील.

X. त्यानंतर **''अभ्यासक्रम निवडा''** या बटन वर क्लिक करावे.

याप्रमाणे उपरोक्त **अ ते फ** मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करुन **''नुतनीकरण करा''** हे बटन क्लिक करावे.

XI. यानंतर आपण जेवढया विद्यार्थ्यांचे अर्ज नुतनीकरण केले असतील तेवढे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास forward होतील.

***

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन नंबर -020-26127569 फॅक्स 020- 26126698 email-

directorsocialwelfare@yahoo.co.in

---

# अनुसुचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी योजनेचा लाभ घेणा-या विद्याथ्यांचे अर्ज नुतनीकरण करणेबाबत.

# महाविद्यालयांना सुचना

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या https://mahaeschol.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरुन अनुसुचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्याथ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक वर्षी ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक होते. तथापि **सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून केवळ अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्याथ्यांना किंवा ज्यांनी डायरेक्ट व्दितीय वर्षात डिग्री अथवा डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे अशा विद्याथ्यांना ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे. तथापि त्यापुढील वर्षापासून त्यांचे अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यत, दरवर्षी त्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.** अशा प्रवेशित पात्र विद्याथ्यांचे संबंधित महाविद्यालयाने ऑनलाईन नुतनीकरण करावयाचे आहे. हे नुतनीकरण करण्यासाठी https://mahaeschol.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचनांप्रमाणे महाविद्यालयांनी प्रक्रिया अवलंबावी.

विभागाच्या उपरोक्त संकेत स्थळावर या सुचना आणि नुतनीकरणासाठीची सविस्तर माहिती पुस्तिकेची लिंक **``प्रवेशित (जुन्या ) विद्यार्थ्यांचे अर्ज नुतनीकरण करण्यासाठी महाविद्यालयाकरिता माहिती पुस्तिका 2015-16 या मथळयानुसार''** उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये सविस्तर कार्यपध्दती विषद केली आहे त्यानुसार प्रत्येक महाविद्यालयांचे संबंधित कर्मचारी व प्राचार्य यांनी स्वत : या सूचना वाचून आपल्या शंकेचे निरसण करुन घ्यावे.

लवकरच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी योजने करीता नुतनीकरण प्रस्ताव सादर करण्याची वेबसाईट / संकेतस्थळ सुरु करण्यात येत आहे. कृपया सर्व महाविदयालयांनी संकेत स्थळावर प्रसिध्द होणा-या सुचना दररोज वाचाव्यात.

( रनजित सिंह देओल )
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे